INTERNATIONAL JOURNAL OF ENGLISH LANGUAGE, LITERATURE AND TRANSLATION STUDIES (IJELR)
A QUARTERLY, INDEXED, REFEREED AND PEER REVIEWED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL
http://www.ijelr.in

ISSN-2349-9451

TRANSLATION (English to Marathi)

Vol.1.Issue.3.,2014

# TRANSLATION OF ‘TO A SKYLARK' by P.B.SHELLEY, 'TO HIS COY MISTRESS' by ANDREW MARVELL & 'THE WIND TAPPED LIKE A TIRED MAN' by EMILY DICKINSON

**APARNA MAHAJAN**
Head, Department of English, CSM's Arts and Commerce College, Chakan
Khed (Taluk), Pune (District), Maharashtra




**ABSTRACT**

As it is a translation there is no abstract for it; yet I would like to share my feelings for the process.

I love teaching literature and particularly dramatics and poetry. While teaching, the more I read the poem and about the poem, it absolutely merges into me. I cannot stop translating them into my mother tongue that is Marathi. These are my moments of creativity and happiness which I thoroughly enjoyed.

©COPY RIGHT ‘KY PUBLICATIONS’

Article Received :02/10/2014
Article Revised:20/10/2014
Article Accepted:24/10/2014

## “आकाशातील गानपक्षा”

आकाशातील गानपक्षा, आनंदकंदा आत्मानंदा
खचितच तू नव्हेस पक्षी..
ना स्वर्गीचा न मृण्मयीचा
मर्मीची तू गीते उधळशी
स्वयंस्फूर्तीने, मंजुळतेने..

जन्मूनी पृथ्वीवर; भरारी मारशी उंच आकाशी
अग्निमेघासम पंख पसरुनी निळ्या अंतराळी..
वाटते तू गाणे गाशी भरारी मारता
की भरारी मारिशी तू गाता गाता..

सूर्यास्ताच्या सुवर्णरंगी
उजळलेल्या नभांमधूनी..
अलगद तरंगत धावता
नवआरंभी नवजाता..
तू शरीरहीन शुद्ध आनंदा

जांभूळलेल्या फिकट संध्यासमयी
तुझी भरारी होई धूसर..
जशी स्वर्गतारका विलोप होई
होता अरूणोदय..
अदृष्य, दर्शनातीत तू
ऐकविशी आर्त आनंदी गीत तू..

धूसर होती चंद्रकिरणे
सुर्याच्या झुंजूमुंजू आगमने..
अदृष्ट तू..
सुव्यक्त तू..
तुझ्या ध्वनीने भरुनी जाई
समग्र भवताल आणि पृथ्वी..
जसा उगवावा चंद्रमा, एकाकी
ढगाआडून काळ्याकुट्ट रात्री..
रिमझिम किरणे व्यापुनी टाकी कैवल्यधामी..

आकळेना आम्हा तू कोण असशी, काय असशी
कशासमान असशी..
प्रसरितो सौम्य प्रकाश ढगांमधूनी इंद्रधनुच्या..
जाणवे तुझे माधुर्य कानी, वर्षावातून तुझ्या सुरांच्या..

विचारमग्न, चिंतनमग्न कवीसम
अनाहूत काव्यगाने;
निर्मिती सृष्टी कल्पने
दुर्लक्षून आशा, भय, समभावने..

गर्भश्रीमंताची लेक (जशी) व्याकुळ होऊनी प्रेमानी
बसूनी उंच महाली..
गाते प्रेमगाणी स्वत:शीच की करण्या हलके मनी
तुझ्या कवनासम ओथंबून जातो, आसमंत, प्रेमरसे भरुनी..
जसा काजवा सोनसळी
दवबिंदूच्या दऱ्यादऱ्यातूनी..
निसटूनी जाई अदृष्यांप्रती
गवत फुलांच्या पड्यापाठी..

हिरव्या पानांना लपेटून
उबदार वाऱ्या संगती..
अलवार पाकळ्या उघडून
गुलाब दरवळे साऱ्या आसमंती..
(तुझ्या गीतासम..)
मधुकोषाच्या लुटारुंना चढे माधुर्याची धुंदी..

वासंतिक रिमझिम धारा,
चमकवती गवताची पाती..
श्रावणसरींच्या चाहुलीने
मोहरली ही पुष्पावती..
आनंदविभोर सारा परिसर
(मात्र) तुझे गान अधिकच सुस्वर..

शिकव मला तू पक्षीकिन्नरा
तुझ्या मनीचे सुस्वर चिंतन
जे न कधी मी ऐकले..
महती सांगे प्रेमाची वा मदिरेची स्तुती
आवेगानी प्रकटणारे, महापुरासम उसळणारे..

स्तोत्रपठण वा वीरश्रीचे गीत
वाटती केवळ अहंमन्य पोकळ बोल..
जाणवे तयामध्ये
कसलेसे न्यूनत्व..

काय असे तुझ्या आनंदमय कवनाचे स्त्रोत?
कोणते क्षेत्र की लाटा, पर्वत, शेतं?
साधे पठार की आभाळाचे आकार?
प्रेम असे का तुझ्या स्वत:चे खास?
की, दु:ख वेदनेचे असलेले तुझे अज्ञान?

ऐकून तुझी ही परमानंदी गाणी
जाणवे दृढते..
नव्हे ही मर्त्य तृप्तीची आनंदी ग्लानी..
गांजल्यात्रासाची छटासावलीही
नसे तुझ्या सान्निध्यी..
प्रेम तुझे हे तुझ्यासारखे
प्रेमाच्या दु:खद मर्त्य प्राप्तीशी तू अनभिज्ञी..

जागृत किंवा निद्रावस्थी
पाहशी तू मरणाला
मर्त्य जीवांच्या स्वप्नाच्याही पलिकडले
सखोल अस्सल ज्ञानी
अन्यथा; कशी निर्मिशील
तुझी स्फटिकस्वच्छ सुरेल प्रवाही गाणी?

आम्ही जगतो फक्त भविष्य आणि भूत
जे नसे, त्यास्तव करित बसतो खंत..
आमचे खरे, मोकळे हास्य असते भरलेले दु:ख वेदने
आमची सुमधुर गाणीही
असती, जी करिती दु:ख कथने..

यदाकदाचित उपहासाने निंद्य लेखिले
द्वेष, गर्व आणि भीतीवत भावना..
आणि कदाचित जन्मा आलो
अश्रू ढाळण्याविना..
अशक्य वाटे तरीही आम्हा
थिटे पडू आमचा आनंद विस्तारण्या..

हर्षोत्फुल्ल आनंदाच्या परिमाणापेक्षा
पुस्तकातील अमूल्य खजिन्यापेक्षा
असे तुझे हे कविकौशल्य
स्वैरस्वतंत्र भूतलीच्या भावभावनांपेक्षा..

शिकव मला तू अंशत: हर्षसंतोषा
जे वसती तुझ्या सतत मर्मस्थानी..
तुझ्यासारखा पिसाट होऊनी
करीत सुरेल स्वरांचा मेळ, गाऊनी गाणी
करीतसे आशा की
भान हरपुनी ऐकेल जगत सारे..
जसे मी ऐकतो तुझ्या सुस्वरे...

प्रा.अपर्णा महाजन
९८२२०५९६७८

मूळ कविता - "To a skylark"
by P. B. Shelley

**( Continue..)**

# लज्जेने चूर झालेल्या त्याच्या प्रेयसीला....

समस्त विश्व अन् कालगती जर आपुले असते,
तर प्रिये,
तुझे हे लाजून चूर होणे अपराध न ठरते असते.
बसलो असतो निवांत निश्चल आणि करीत चिंतन
कुठे जावू फिरण्यासाठी अन् कसा घालवू प्रणयाचा दिन?

लेवून माणके असतीस बसली तू भारतातल्या गंगेतटी
अन् मी इकडे झुरत, कुरकुरत हंबर काठी .

महापुराच्या प्रलयापूर्वी दशवर्षाधीपासून
मी केली असती प्रेमाची आराधना;
अन् तू ज्युंच्या धर्मांतरापावेतो, वेळ
दवडला असतास, माझे प्रेम नाकारण्या!

वृक्षवल्लीसम प्रेम हे माझे
वृद्धिंगत असते ही झाले
विस्तीर्ण साम्राज्याहूनी
आणि अधिकच मंदाई

शतक एक गेले असते गुणगान करण्या नयने तुझिया
अन् ललाट तुझे निरखण्या
दोन शतके खचितच,
तुझ्या एकेक वक्षाची पूजा बांधण्या
अन् तीस हजार वर्षे तरी उर्वरित वर्णना.

एकेक युग किमानपक्षी प्रत्येक अवयवा
होईल दर्शन हृदयाचे तुझिया
शेवटचे युग सरता सरता...

कारण प्रिये, आहेसच तू सत्पात्र या साऱ्या वर्णने
नसतो शकलो प्रेम व्यक्त मी याहूनी कमी परिमाणे.

मात्र, ऐकू येतो आहे सततची मजला माझ्या मागे
येतो आहे उडता रथ काळाचा जवळी वेगे.

अन् तिथे पलिकडे समोर दिसते
वाळवंट शाश्वतिक कालाचे विस्तृते

सौंदर्य तुझे गं लोपेल थडग्यामध्ये संगमरवरी
तुला न माझे ऐकू येईल प्रेमगीत, घुमणारे सर्वत्रयी

किडे मकोडे करतील भंग तुझ्या जपलेल्या कौमार्यी
अन् तुझी भ्रामक प्रतिष्ठा होईल मातीमयी
माझे हे आकृष्ट प्रेम होईल भस्म धसधसूनी

थडगे असे ही निश्चित सुंदर एकांतवासी जागा
पण नसे कदापि शक्य परस्परांस आलिंगन्या.

यास्तव..
दवबिंदूंनी भिजल्या पहाटेसम
सजलेले तुझे हे रसरशीत लावण्य
असे जोवरी तुझे अधिर अुसासणारे मन
अन् रोमरोमातून पेटलेले तन
होऊया आपण क्रिडासक्त
याच क्षणी, भक्ष्य मिळविण्या आतुर पक्षागत

साजरा करुया वेळ आपुला नच दवडता क्षणकाली
पेक्षा होण्या दुर्बळ काळाच्या समर्थ चाली.

होऊया एकरुप पूर्णत्वाने सर्व शक्तिनिशी
प्रेमभराने आलिंगुनी होऊया चेंडुप्रती
होऊया क्षुब्ध आक्रमकोनी, फाडूनी सुखतृप्ती
आरपार शिरुनी आयुष्याच्या लोहासम फाटेतुनी

जरी थोपवू न शकलो सूर्याला आपण असे
करुया शर्यत आपण त्याच्या वेगासवे...

----------- ** -------------

मूळ कविता : मॅथ्यू ॲरनॉल्ड ''टू हिज कॉय मिस्ट्रेस''
भाषांतर : अपर्णा महाजन

## वारा ..... माझा सोबती !!

हलक्या हातांनी वाऱ्यानी माझा दरवाजा ठोठावला
आणि यजमान पदाला साजेसं;
''या! या!'' म्हणत मी त्याचं जोरदार स्वागत केलं.
माझा पाहुणा माझ्या घरात आला...

चंचलवृत्तीच्या अपंग पाहुण्याला
खुर्चीत बसायला सांगणं... अवघड होतं;
एखाद्या सोफ्याला हवेच्या आधीन करण्याएवढं!

अस्थिहीन, आकारहीन अशा
त्या पाहुण्याचं बोलणं; म्हणजे जणू
एखाद्या बलाढ्य झाडावरच्या असंख्य पक्षांच्या कूजनांचे
निव्वळ नि:श्वास!

त्याचा अदृश्य फुग्गीर चेहरा
त्याच्या फिरणाऱ्या बोटांतून
उमटणारं संगीत;
त्याच्या अशक्त फुंकरीतून
काचेतून थरथरणारे तरंग निर्माण करणारं...

चंचलतेने घरभर फिरुन
जणू घरातल्या एकटेपणाला घाबरुन,
पुन्हा दारातून पसार झुळ्ळकन्...
आणि मी ...
मी ... पुन: एकदा एकाकी!

----------- ** -------------

मूळ कविता : एमिली डिकीन्सन ''द विंड टॅप्ड लाईक अ टायर्ड मॅन''
भाषांतर : अपर्णा महाजन

REFERENCES

Original Article sources: 'To a Coy mistress 'http://www.poetryfoundation.org/poem/173954
'To a skylark' http://www.poetryfoundation.org/poem/174413
'Wind Tapped like a tired man' is the following link: http://www.bartleby.com/113/2030.html